# पाण्याच्या पातळीची निरिक्षणे

भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेने संपुर्ण महाराष्ट्रात १५०५ पाणलोट क्षेत्रात विभागणी केली आहे. लातूर जिल्हयात यातील ३९ पाणलोट क्षेत्रे येतात. जिल्हयातील भूजलाचा अंदाज बांधण्यासाठी पाणलोट क्षेत्रे निहाय अभ्यास केला जातो.

यामध्ये सर्वसाधारणपणे प्रत्येक पाणलोट क्षेत्रात ३ निरिक्षण विहीरी निवडण्यात आल्या आहेत.लातूर जिल्हयात अशा १०९ निरिक्षण विहीरी निवडल्या आहेत.

या निरक्षिण विहीरीच्या पाण्याच्या पातळीच्या नोंदी वर्षातून ४ वेळा घेण्यात येतात हा कालावधी खालील प्रमाणे आहे.

१. मान्सूनपुर्व कालावधी :- मे महिन्याचा शेवटचा आठवडा
२. मान्सूनोत्तर कालावधी :- ऑक्टोंबरचा पहिला आठवडा
३. रब्बी हंगामातील उपसा सुरू असताना :- जानेवारी शेवटचा आठवडा
४. उन्हाळयाची सुरूवात होताना :- मार्चचा शेवटचा आठवडा

या ४ वेळच्या नोंदीमधून मान्सूनपुर्व व मान्सून नंतरच्या नोंदीचा अभ्यास करून जिल्हयात जास्तीत जास्त भूजलात तफावत किती होते याचा अभ्यास करण्यात येतो.

टंचाईचा अहवाल तयार करताना ऑक्टोबरच्या पाण्याच्या पातळीची तुलना मागील ५ वर्षातील ऑक्टोबरच्या सरासरी पाण्याच्या पातळीशी करण्यात येते.

तसेच त्या वर्षाच्या सरासरी पाऊस याची तुलना मागील ५ वर्षातील मान्सूनचे पावसाशी केली जाते व पाण्याच्या पातळीची तुलना व पर्जन्यमान यांचे संयुक्त अभ्यासावरून संभाव्य टंचाईचे क्षेत्र व गावे निश्चीत करण्यात येतात.